राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६६८४/२०२६

श्रीम. विद्या गिरिधर अटकाले,
122, चांदले हाउस वाडवली,
डॉ. गिडवानी रोड, चेंबूर, मुंबई 400 074.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा भूमापक,
भुमि व मिळकत शाखा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई 400051.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. भुमि व मिळकत व्यवस्थापक
भुमि व मिळकत शाखा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई 400051.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०८.२०२६

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
०६.०२.२०२२	--	२२.०२.२०२३	१६.०३.२०२३

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक ०६.०२.२०२२ रोजी च्या जोडपत्रानुसार त्यांनी दिनांक ०७.०६.२०२२ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे दिलेल्या **जोडपत्र अ** च्या अनुषंगाने दिनांक ०७.०६.२०२२ रोजी केलेल्या तक्रारीवर प्रत्यक्षात करण्यात आलेली कार्यवाही याची माहिती मागितली असून वरील तक्रार ही श्री.मोहन शिंगरे व अनिल मोरजकर या दोन कर्मचाऱ्यांविरुद्ध असून सदर तक्रार अर्ज हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश अध्यक्ष श्री.मिलिंद वानखेडे यांच्या लेटरहेडवर करण्यात आली होती. या संदर्भात अपिलार्थींच्या उपरोक्त अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीनी दिनांक ०७.०६.२०२२ रोजीचा अर्ज प्राधिकरणाच्या भूमी व मिळकत शाखेस प्राप्त झाला नाही तसेच श्री.मिलिंद वानखेडे यांनी महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या नांवे गैरअर्जदार श्री.मोहन शिंगरे यांच्या विरोधात केलेला तक्रार अर्ज हा पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार मागे घेण्याबाबतचा दिनांक ०४.१०.२०२२ रोजी च्या पत्रान्वये कळविले असून या पत्राची प्रत अपिलार्थिना प्रदान करण्यात आलेली आहे. याविरुद्ध दाखल प्रथम अपील अर्जावर तत्कालीन

अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक भूमी व मिळकत व्यवस्थापक यांनी स्वतः भूमी व मिळकत विभागास प्राप्त झालेल्या आवक नोंदी वरून माहितीची तपासणी करून माहिती दिली असल्याबाबत जन माहिती अधिका-यांचे वक्तव्य नोंदवित तसेच अर्जदारांना माहिती समजावून सांगण्यात आली असून सदर तक्रार अर्जाबाबत अर्जदारांचे समाधान झाले असल्याने त्यांनी अपील निकाली काढण्यास सहमती दर्शविली असे नोंदवीत अपील अर्ज निकाली काढलेला आहे. याविरुद्ध अपिलार्थिनी दिनांक २८.०४.२०२३ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीत प्राधिकरणातर्फे कोणीही हजर नाहीत. तथापि, अपिलार्थीनी उपरोक्त अपील अर्ज निकाली काढत असताना प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना त्यांचे म्हणणे नीट मांडता आले नसल्याचे नमूद केले आहे. ही बाब लक्षात घेता विद्यमान जन माहिती अधिकारी तथा भूमापक भूमी व मिळकत शाखा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी अपिलार्थिनी दिनांक ०७.०६.२०२२ रोजी कार्यालयीन कर्मचारी श्री.मोहन शिंगरे व श्री.अनिल मोरजकर यांच्याविरुद्ध केलेल्या तक्रारीवर प्रत्यक्षपणे करण्यात आलेली कार्यवाही अथवा यावर करण्यात आलेली प्रक्रिया या संदर्भात कार्यालयीन अभिलेखात **कलम २ (च)** प्रमाणे माहिती उपलब्ध असल्यास अपिलार्थिना विनामूल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नसतीबद्ध करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीनी दिलेली तक्रार अर्जाची प्रत कार्यालयात उपलब्ध नसल्यास अपिलार्थीनी उपरोक्त तक्रार अर्जाची एक प्रत पुन:श्च एकदा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे योग्य त्या कार्यवाही करिता प्रदान करावी व त्यावर संबंधित प्राधिकरणात माननीय मुख्य सचिव यांच्या दिनांक १८.०१.२०१३ रोजीच्या परिपत्रकात प्राप्त निवेदनावर आठ आठवड्यात कार्यवाही करण्याबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रस्तुत तक्रार अर्जावर विहित प्रक्रिया, नैसर्गिक न्यायतत्त्व इत्यादी सर्व बाबींचे पालन करून योग्य तो प्रतिसाद द्यावा.

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र.६६८४/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

स्वाक्षरीत/-
(राहुल भा.पांडे)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ११.०८.२०२६